सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/६९२ अत्यंत महत्त्वाचे व कालमर्यादेचे दिनांक : ११/०३/२०२६.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
संबंधित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय :– **कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना विद्यार्थी मानधन व इतर माहितीची लिंक विशेष बाब म्हणून सुरू.**

संदर्भ :– या विभागाचे विविमं/२०२५–२६/०२५ चे योजनेचे मान्यता पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विद्यार्थी विकास मंडळामार्फत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेची मान्यता देण्यात आलेली असून सदर योजनेची अंमलबजावणी करताना योजनेच्या नियमावली, अटी व मार्गदर्शक तत्वांनुसार काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

माहे जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी विद्यार्थ्यांची मानधन माहिती भरणे प्रलंबित असल्यामुळे काही महाविद्यालय/परिसंस्थांनी सदर लिंक पुन:श्च कार्यान्वित करण्याची मागणी या विभागाकडे केलेली आहे.

अशा सर्व इच्छुक महाविद्यालय/परिसंस्थांच्या मागणीनुसार ;

१. माहे जुलै २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीकरिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत सहभागी प्रत्येक/सर्व विद्यार्थी मानधन माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याची लिंक विशेष बाब म्हणून दि. ११ मार्च रोजी कार्यान्वित करण्यात आली असून सदर लिंक दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत सुरू राहिल.

२. यासंदर्भातील माहिती ही आर्थिक बाबींशी निगडीत असल्यामुळे सदर लिंक पुढील कालावधीत पुन:श्च कार्यान्वित करणे संयुक्तिक नसल्यामुळे सदर कार्यवाही विहित मुदतीतच पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

३. वरील कालावधीतील यापूर्वी भरलेली व भरली जात असलेली माहिती ही अंतिम असेल सदर माहितीत कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. तसेच सदर माहिती ही केंद्रिय लेखा परीक्षणाच्या अर्जास लिंक केलेली असल्यामुळे सदर माहिती काळजीपूर्वक तपासूनच भरावी.

४. केंद्रीय लेखापरीक्षणातून अशा अप्राप्त त्या त्या महिन्याचे अदा केलेले मानधन वगळले जाईल आणि विद्यापीठाकडून अशा केलेल्या मानधनाचे अनुदान मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

५. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेची अंमलबजावणी करताना योजनेच्या नियमावली, अटी व मार्गदर्शक तत्वांनुसार सदर योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जावी.

त्यानुसार आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका या योजनेतील वरील कालावधीतील योजनेत सहभागी प्रत्येक/सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन पद्धतीने माहिती काळजीपूर्वक व जबाबदारीने अचूकपणे भरण्याबाबत व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याबाबत संबंधित विभागांना/शिक्षकांना अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**ऑनलाईनबाबत/तांत्रिक अधिक माहिती व मदतीसाठी :**
०२०–७१५३३६३३
Email: nssbsdsupport@pun.unipune.ac.in
**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालय संपर्क : ०२०–२५६२२६८०/८१**

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक (अतिरिक्त कार्यभार), विद्यार्थी विकास मंडळ